# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## Department of Lifelong Learning and Extension (DLLE)

### सहकार प्रमाणपत्र शिक्षणक्रम

### माहितीपत्रक





**Contact Details**

Department of Lifelong Learning and Extension (DLLE)
Dr.A.P.J. Abdul Kalam Vidyarthi Bhavan,
1st Floor,Near Rikshaw Stop
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,
Jalgaon (MS)

**Web-page :** https://nmu.ac.in/external-education
(click on certificate programme)

**E-mail:** ideal@nmu.ac.in

**Facebook ID :** DEEL,Kavayitri Bahinabai Chaudhari
North Maharashtra University, Jalgaon.

**Contact:** 0257-2257495/2258496





# प्रस्तावना

आपला महाराष्ट्र हे सहकार चळवळीचे माहेरघर मानले जाते. अगदी गावपातळीवरील विकास सोसायट्या, पतसंस्था, दूध संघ, कृषी उत्पन्न बाजार समित्यांपासून ते शहरी भागातील मोठ्या नागरी सहकारी बँका आणि गृहनिर्माण संस्थांपर्यंत (Housing Societies) सहकाराचे एक प्रचंड मोठे जाळे आपल्या राज्यात पसरलेले आहे. "विना सहकार, नाही उद्धार" हा केवळ विचार नसून तो आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आणि रोजगाराचा एक भक्कम कणा आहे.

आजच्या वाढत्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी शिक्षण पुरेसे ठरत नाही. नोकरी मिळवण्यासाठी तुमच्याकडे व्यावहारिक कौशल्ये आणि व्यावसायिक ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. सहकार क्षेत्र प्रचंड वेगाने वाढत असून, या क्षेत्रात प्रशासकीय कामकाज, हिशोबलेखन (Accounting) आणि कायदेशीर बाबी हाताळू शकणाऱ्या कुशल तरुणांची मोठी मागणी आहे.

आपल्या राज्यात सहकार क्षेत्र (सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, दूध संघ इत्यादी) अत्यंत व्यापक असून, या क्षेत्रात कुशल तरुणांसाठी रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना या संधींचा थेट लाभ घेता यावा आणि त्यांना रोजगाराभिमुख (Job-oriented) प्रशिक्षण मिळावे, यासाठी आजीवन विभागामार्फत सहकार प्रमाणपत्र अभ्यासक्रम' सुरू करण्यात येत आहे.

हा केवळ एक पुस्तकी अभ्यासक्रम नसून, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी लागणारे कौशल्य शिकवणारा हा एक कौशल्याभिमुख कोर्स' आहे. अगदी कमी वेळेत आणि कमी खर्चात पूर्ण होणारा हा तीन महिन्यांचा अभ्यासक्रम तुम्हाला बँकिंग, प्रशासन आणि लेखापरीक्षण यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान देईल. तुम्ही सहकार क्षेत्रात नवीन नोकरीच्या शोधात असाल, स्पर्धा परीक्षांची तयारी करत असाल किंवा स्वतःची कन्सल्टन्सी सुरू करू इच्छित असाल, तर हा अभ्यासक्रम तुमच्यासाठी एक भक्कम पाया ठरेल.





## शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांना सहकाराचा अर्थ, त्याची तत्त्वे आणि सहकार चळवळीचा इतिहास समजून सांगणे.
- सहकारी संस्थांचे (उदा. पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, बँका) दैनंदिन कामकाज, व्यवस्थापन आणि प्रशासन कसे चालते याबाबत माहिती देणे.

## शिक्षणक्रमाचे महत्व

- नागरी सहकारी बँका, ग्रामीण बँका, आणि क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांमध्ये काम करण्याची संधी मिळू शकते.
- मोठ्या शहरांमध्ये गृहनिर्माण संस्थांचे कामकाज पाहण्यासाठी सोसायटी मॅनेजर (Society Manager) म्हणून मोठी मागणी असते. त्यासाठी ह्या अभ्यासक्रमाचा फायदा होऊ शकतो.
- कृषी उत्पन्न बाजार समित्या, दूध उत्पादक संघ, आणि सहकारी साखर कारखान्यांमध्ये नोकरी मिळू शकते.
- स्वतःची कन्सल्टन्सी सुरू करून नवीन सहकारी संस्थांची नोंदणी करणे, त्यांचे हिशोब ठेवणे, आणि कायदेशीर सल्ला देण्याचे काम करता येते.



## शिक्षणक्रमाची वैशिष्ट्ये (Features)

- ❑ ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्याची सुविधा
- ❑ विषय तज्ज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकांचे मार्गदर्शन
- ❑ शनिवार आणि  रविवार ऑनलाईन वर्ग
- ❑ शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाकडून अधिकृत प्रमाणपत्र मिळणार

## शिक्षणक्रम संरचना (Programme Structure)

| | |
|---|---|
| **लक्ष्य गट (Target Group)** | **18 वर्षांपुढील कोणीही प्रवेशास पात्र (Above 18 Years old)** |
| **प्रवेश क्षमता (Intake Capacity)** | **50 पर्यंत** |
| **श्रेयांक (Credit)** | **04** |
| **एकूण तास (Total Hours)** | **60** |
| **ऑनलाईन सत्रे (Online Sessions)** | **शनिवार आणि  रविवार (Saturday & Sunday)** |
| **शुल्क (Fees)** | **1500/-** |
| **परीक्षा (Exam)** | **लेखी (Written) + प्रात्यक्षिक + मौखिक (Oral)** |
| **एकूण  गुण (Total marks for Exam)** | **100** |

**डॉ.मनिषा व्ही.जगताप**
**सहा.प्राध्यापक आणि**
**शिक्षणक्रम समन्वयक,आजीवन विभाग**

**प्रा.मनिष र.जोशी**
**संचालक,**
**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आजीवन विभागातर्फे हार्दिक शुभेच्छा**